॥ मंदिर गृह प्रकाश: ज्ञानविवाहौच पंचतत्वानी ॥

गोमंतक मराठा समाज, गोवा

स्थापना : ८/५/१९२५

नोंदणी क्र. २४/१९६४

## गोमंतक मराठा समाज, गोवा

# गोमंतश्री

### त्रैमासिक मुखपत्रिका




वर्ष ४८ वे     क्रमांक २७५     सप्टेंबर २०२३

# गोमंतक मराठा समाज, गोवा

## केंद्रिय कार्यकारी समिती २०२३-२०२६



**ॲड. सुरेश काणकोणकर**
अध्यक्ष
मो. : ९९६०३८९३७१/
८६६८४२४५०७



**सौ. दिपाली बाणस्तारकर**
उपाध्यक्ष
मो. : ९४०३८१७९८१



**सौ. उत्कर्षा बाणस्तारकर**
सचिव
मो. : ९५४५१६८८०२



**सौ. मृणाल लोलयेकर**
सं. सचिव
मो. : ९०४९९०५३३०



**श्री. जितेंद्र शिरगांवकर**
खजिनदार
मो. : ९३२२७३८६९९



**श्री. महेश केरकर**
सदस्य
मो. : ९३५२७३३६४



**श्री. संदेश नाईक**
सदस्य
मो. : ९८८१३३५३१४



**श्री. राजेश मांद्रेकर**
सदस्य
मो. : ९०४९२६४०९७



**श्री. आनंद पेडणेकर**
सदस्य
मो. : ९१५८०९५४०३

# गोमंतक मराठा समाज, गोवा

# त्रैमासिक मुखपत्रिका

## जुलै २०२३ – सप्टेंबर २०२३

CSR Registration No:- CSR00032896
12A Registrat No:- AAAAG0603QE20214
80G Reg. No. AAAAG0603QF20211

# संपादकीय...



**रंजन म. नाईक**
**संपादक**
मोबाईलः ९८२३१५४३३६
ईमेलः ranjan.naik-12@gmail.com

बऱ्याच वेळा आपले समाजबांधव विचारणा करतात. बहुतेक करून शिक्षण घेणाऱ्या व नोकरीच्या शोधात असलेल्या युवा मुला-मुलींचे पालक राखीवतेबद्दल व सरकारची त्या संदर्भातील भूमिका यावर विचारणा केली जाते. त्यांना माझे उत्तर असते, ही गोष्ट काही आमच्या हातात नाही. सरकार दरबारातील कार्यपद्धती नुसार राखिवतेबद्दलचा निर्णय होणार आहे. त्यादृष्टीने केंद्रिय समितीकडून प्रयत्न केले जात आहेत.

काही राजकारण्यांना वाटते आमच्या समाजाला राखिवतेची आवश्यकता का भासते? राखिवतेची गरज खरच आहे का? हे प्रश्न बऱ्याचवेळा ऐकिवात आले आहेत व आजही ऐकायला येतात.

मला आठवते, गोरख मांद्रेकर यांच्या अध्यक्षतेखालील समीती सदस्य शिष्टमंडळाने तत्कालिन मुख्यमंत्री कै. मनोहर पर्रिकर यांची त्यांच्या शासकीय कार्यालयात भेट घेतली होती. त्यावेळी त्यांनीही हसत हसत हीच विचारणा केली होती. त्यांनी प्रतिप्रश्न करताना म्हटले होते, गोव्याचे भाग्य विधाते प्रथम मुख्यमंत्री स्व. भाऊसाहेब बांदोडकर तुमच्या समाजाचे, गोव्याच्या प्रथम महिला मुख्यमंत्री स्व. शशिकलाताई काकोडकर तुमच्या समाजाच्या, थोर शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर तुमच्या समाजाचे. गानकोकिळा स्व. लतादीदी मंगेशकर तुमच्या समाजाच्याच शिवाय स्वतांच्या नांवाबरोबरच समाजाचे नांवही उज्वल करणाऱ्या काही समाज बांधवांची नांवे आम्हांला सांगितली.

अशी ही रत्ने ज्या समाजात जन्मली, त्या समाजाला राखिवतेची आवश्यकताच नाही, असे मला वाटते, तुम्हांला तसे वाटत नाही का? असा प्रश्नही त्यांनी विचारला होता. त्यावर मी त्यांना म्हटले होते, सर तुम्ही सांगितलेली नांवे व इतरही काही नावे

वानगीदाखल देता येतील. परंतू या यादीतील नांवांवर आपण बारकाईने लक्ष दिले तर आपणांला एक गोष्ट लक्षांत येईल की, या यादीतील बहुतेक नावे भूतकाळातील आहेत. एखाद दुसरे नांव वर्तमान काळातील असेल.

वर्तमान काळात उल्लेख करण्यासारखे एखाद दुसरे नांव वानगीदाखल घेऊ शकतो. या यादीत तद्नंतर भर पडू शकलेली नाही. तुमच्या समाजातील बहुतेक सर्व लोक सुशिक्षित आहेत. तुमचा समाज गोव्यातील एक सुशिक्षित समाज आहे.

यावर भाष्य करताना मी म्हटले होते, गोव्यातील खास करून काणकोण, सांगे, केपे, सत्तरी, पेडणे, डिचोली, तालुक्यांसह इतर तालुक्यांतील काना कोपऱ्यांतील बऱ्याच समाजबांधवांचे राहणीमान व शिक्षण घेण्यासाठी त्यांच्या मुलांना किती त्रास सोसावे लागतात, ते पाहिले तर नोकरी करीता किती हालअपेष्टा सोसाव्या लागतात ते लक्षात येईल.

आमच्या शिष्टमंडळाशी चर्चा केल्यानंतर त्यांनी म्हटले, आपण जरूर या दिशेने प्रयत्न करीन सद्या राखिवता यादीत अंदाजे २.४२ टक्के भाग शिल्लक आहे. त्यांत तुमच्या समाजाचा समावेश करता येईल का यावर सकारात्मक विचार आपण करीन. तुम्ही संबंधित मंत्र्यांची भेट घ्या. मी नंतर त्यांच्याशी चर्चा करून त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करीन.

यावर मी त्यांना विनंती केली होती की तोपर्यंत आमच्या समाजातील होतकरू विद्यार्थ्यांना किमान शिक्षण क्षेत्रातील उच्च शिक्षण संधी लाभावी या करीता राखिवता यादीत सामावून घेण्यात यावे. म्हणजे राखिवतेचा लाभ नोकरी संबंधी होणार नसला तर उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या आमच्या समाजातील होतकरू विद्यार्थ्यांना याद्वारे काही प्रमाणात लाभ होऊ शकेल.

तद्नंतरच्या केंद्रीय समित्यांनीही आपल्या परिने प्रयत्न केले, परंतू आपल्या सर्वसाधारण सभांत समाज बांधवांनीं प्रश्न उपस्थित केले, तालुका पातळीवर मेळावेही घेण्यात आले, तथापी या मागणीला वेग लागू शकलेला नाही.

या मागणीवर अवलंबून न राहता तमाम समाज बंधू-भगिनींनी आपल्या पाल्यांना जास्तीत जास्त प्रयत्न करून अधिकाधिक निकालाची टक्केवारी प्राप्त करण्यासाठी प्रेरित करावे असे आवाहन करावे असे मला वाटते. आमच्या बऱ्याच समाज बांधवांनी प्रतिकूल परिस्थितीत शिक्षणांत प्रगती केल्याचे आपल्या लक्षात येईल. आजच्या सारख्या शैक्षणिक सुविधा व सोयी त्याकाळी नव्हत्या हे महत्त्वाचे. शिवाय समाजाच्या उच्च शिक्षणाकरीता बिन व्याजी शैक्षणिक कर्ज योजनेचाही युवा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहे. उज्ज्वल भविष्यासाठी कष्ट, मेहनती शिवाय पर्याय नाही हे विद्यार्थी वर्गाने विसरता कामा नये.

# अध्यक्षीय मनोगत



**ॲड. सुरेश काणकोणकर**
**अध्यक्ष,** केंद्रिय समिती २०२३-२०२६
मोबाईल : ९९६०३८९३७१ / ८६६८४२४५०७

सालसेत तालुका वगळता, अन्य ११ ही तालुक्यातून नूतन तालुका समित्या निवडण्याचे काम पूर्ण झालेले आहे. लवकरच सालसेत तालुक्यातूनही नवीन समिती निवडली जाईल. सर्व नूतन तालुका समितीचे अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा.

नुकत्याच तालुकास्तरीय शिष्यवृत्ती वितरीत करण्यात आल्या आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

ह्याच मुखपत्रिकेतून आगामी आमसभेची सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. गेल्या ४५ वर्षापासून माझा ह्या संस्थेशी जवळचा संबंध आहे. ह्या संस्थेच्या अनेक समित्यांचे कार्य मी जवळून पाहिले आहे. तसेच आमसभेत उपस्थित राहून प्रत्यक्ष कामकाजात भाग घेतलेला आहे. आमसभेमध्ये विविध विषयांवर चर्चा करताना सदस्यांमध्ये वादविवाद होताना पाहिले आहेत. पण हल्लीच्या काळात ह्या वादविवादाचे रुपांतर एकामेकांच्या अंगावर धावून जाणे, एकामेकाविरुद्ध वाईट शब्द वापरून गोंधळ घालणे हे प्रकार वाढलेले दिसतात.

आमचा समाज हा एक सुसंस्कृत, सुशिक्षित समाज म्हणून ओळखला जातो. त्या प्रतिमेला तडा जाऊ देता कामा नये याची आपणच काळजी घेतली पाहिजे. आमसभेमध्ये प्रत्येक सभासदांना आपले विचार मांडण्याचे व शंकेचे निरसन करण्याची संधी मिळेल. प्रत्येक सभासदांच्या प्रश्नाला समाधानकारक उत्तर देण्याचा आमचा प्रयत्न असेल म्हणून माझी सर्व सभासदांना कळकळीची विनंती आहे की, त्यांनी आमसभा सुरळीत पार पाडण्यास मदत करावी. विनाकारण आमसभेचे वातावरण कलुषित होणार नाही याची काळजी घ्यावी व सर्व सभासदांनी आमसभेला उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.

# आमसभा सूचना

गोमंतक मराठा समाज, गोवा या संस्थेची सर्वसाधारण आमसभा, रविवार, दि. २९-१०-२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता, राजाराम स्मृती सभागृह, तिसरा मजला, दयानंद स्मृती इमारत, स्वामी विवेकानंद मार्ग, पणजी-गोवा येथे बोलाविण्यात येत आहे.

**-: विषय पत्रिका :-**

१. दि. १६-४-२०२३ च्या आमसभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.
२. सन २०२२ ते २०२३ वर्षाच्या ऑडीटेड स्टेटमेंटला (हिशेबास) मान्यता देणे.
३. डिचोली बांधकाम प्रकल्पाच्या रिव्हीव रिपोर्ट संबंधी.
४. दोन अंतर्गत हिशेब तपासनीसाचीं नेमणूक करणे.
५. सल्लागार समितीची नेमणूक करणे.
६. तांत्रिक समिती, ओबीसी समिती, Disciplinary समिती, शैक्षणीक कर्ज छाननी समिती व संस्थेच्या शतक महोत्सव समितीची निवड व नेमणूक करणे.
७. २०२३-२६ केंद्रिय समितीच्या ३ रिक्त सभासद पदाचीं नेमणूक करणे.
८. ओबीसी विषय संबधी चर्चा.
९. अध्यक्षांच्या अनुमतीने येणारे अन्य विषय विचारात घेणे.

**टीप :**

१) बैठकीस नियोजित समयी व जागी आवश्यक गणसंख्यापूर्ती न झाल्यास, अर्ध्या तासानंतर सभेच्या कामकाजास सुरूवात होईल. त्यास गणसंख्येची आवश्यकता असणार नाही. आमसभेत घेतलेले सर्व निर्णय सर्व सभासदांनां बंधनकारक असतील. उपस्थित सभासदांसाठी दुपारी भोजन व्यवस्था असेल.
२) ज्या सभासदांना आमसभेसाठी सूचना अथवा प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी कृपया आठ दिवस अगोदर कार्यालयात पाठवावेत.

सही/-
**सौ. उत्कर्षा बाणस्तारकर**
सचिव

सही/-
**सौ. मृणाल लोलयेंकर**
सं. सचिव

दि. : ०१-१०-२०२३
पणजी - गोवा

# INDEPENDENT AUDITOR'S REPORT

**Opinion**

We have audited the attached financial statements of Gomantak Maratha Samaj (Goa), which comprise the Balance Sheet as at 31$^{st}$ March 2023, the Income and Expenditure Account and the Receipts and Payments Account for the year then ended including a summary of significant accounting policies and other explanatory information.

In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the aforesaid financial statements give the information required by Societies Registration Act, 1860 ('the Act') in the manner so required and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India, of the state of affairs as at 31$^{st}$ March 2023 and its excess of Income over expenditure for the year ended on that date.

**Basis of Opinion**

We conducted our audit in accordance with the Standards on Auditing (SAs) issued by ICAI. Our responsibilities under those standards are further described in the Auditor's Responsibilities for the Audit of the Financial Statements section of our report. We are independent of the entity in accordance with the ethical requirements that are relevant to our audit of the financial statements, and we have fulfilled our other ethical responsibilities in accordance with these requirements. We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our opinion.

**Responsibilities of Management and Those Charged with Governance for the Financial Statements**

The Trustees (Management) are responsible for the preparation of these financial statements that give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India. This responsibility includes the design, implementation and maintenance of internal control relevant to the preparation of the financial statements that are free from material misstatement, whether due to fraud or error.

In preparing the financial statements, management is responsible for assessing the entity's ability to continue as a going concern, disclosing, as applicable, matters related to going concern and using the going concern basis of accounting unless management either intends to liquidate the entity realistic alternative but to do so. Those charged with governance are responsible for overseeing the entity's financial reporting process.

**Auditor's Responsibilities for the Audit of the Financial Statements**

Our objectives are to obtain reasonable assurance about whether the financial statements as a whole are free from material misstatement, whether due to fraud or error, and to issue an auditor's report that includes our opinion. Reasonable assurance is a high level of assurance, but is not a guarantee that an audit conducted in accordance with SAs will always detect a material misstatement when it exists. Misstatements can arise from fraud or error and are considered material if, individually or in the aggregate, they could reasonably be expected to influence the economic decisions of users taken on the basis of these financial statements.

As part of an audit in accordance with SAs, we exercise professional judgment and maintain professional skepticism throughout the audit. We also:

- Identify and assess the risks of material misstatement of the financial statements, whether due to fraud or error, design and perform audit procedures responsive to those risks, and obtain audit evidence that is sufficient and appropriate to provide a basis for our opinion. The risk of not detecting a material misstatement resulting from fraud is higher than for one resulting from error, as fraud may involve collusion, forgery, intentional omissions, misrepresentations, or the override of internal control.
- Obtain an understanding of intemal control relevant to the audit in order to design audit procedures that are appropriate in the circumstances, but not for the purpose of expressing an opinion on the effectiveness of the entity's internal control.
- Evaluate the appropriateness ofaccounting policies used and the reasonableness of accounting estimates and related disclosures made by management.
- Conclude on the appropriateness of management's use of the going concern basis of accounting and, based on the audit evidence

obtained, whether a material uncertainty exists related to events or conditions that may cast significant doubt on the entity's ability to continue as a going concern. If we conclude that a material uncertainty exists, we are required to draw attention in our auditor's report to the related disclosures in the financial statements or, if such disclosures are inadequate, to modifr our opinion. Our conclusions are based on the audit evidence obtained up to the date of our auditor's report. However, future events or conditions may cause the entity to cease to continue as a going concem

We communicate with those charged matters, the planned scope and timing including any significant deficiencies in audit. with governance regarding, among other of the audit a4d-sig.nrflcant audit findings, internal control that we identify during our audit.

**Report on Other Legal and Regulatory Requirements**

Further to our comments referred to above, we report that:

1) The accounts are.maintained regularly, and in accordance with the provisions the Societies Registration of Act, tgOO ana the Rules framed there under.
2) The receipts and disbursements are properly and correctly shown in the accounts.
3) The Bank balances were verified by us with the certificates from the bankers. The Cash balance shown in the accounts was found correct.
4) All books, deeds, accounts, vouchers and other documents required by us were produced before us.
5) The Executive Secretary, Treasurer, Accountant or any other person required to appear before us did so and furnished the necessary information required by us.
6) No property or funds of the Society were applied for any object or purpose other than the object or purpose of Samaj.
7) The creditors outstanding for more than one year is Rs. Nil and the debtors outstanding for more than one year net of Provision is Nil.
8) All expenditures incurred on behalf of Samaj have been sanctioned from time to time by the Governing body, Managing committee or

any other person authorized to do so under the Rules & Regulations of Samaj.

9) Minutes of the meeting of the General Body, Goveming Body and other Bodies or Committees are maintained regularly and properly.

l0) List of members of the society is maintained and kept up-to-date.

ll) Any communication to the Samaj can be made to Mrs. Utkasrsha Banastarkar Secretary, Gomantak Maratha Samaj, Panaji-Goa.

12) No part of the money of Samaj has been invested in Contravention with the Rules of the Council.

13) The Society is engaged in the activities relating to promotion of intellectual, moral, social, educational, economical and cultural development of Gomantak Maratha Samaj Goa.

14) The Quotations for repairs, expenditure exceeding Rs. 5000/- were duly invited.

For, S.P. BHANDARE & ASSOCIATES
CHARTERED ACCOUNTANTS
FIRM REGN NO 1OI157W

S.P. BHANDARE
PROPRIETOR
M. No. 35615
PLACE:PANAJI_GOA.
DATE: 15TH SEPTEMBER 2023
UDIN : 2303561 5BGVFGU3458

Note : Detailed Audited Statement of Accounts are available in the office.

# कै. भाऊसाहेब बांदोडकरांची ५० वी पुण्यतिथी साजरी



**भाऊसाहेब बांदोडकर यांच्या ५० व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन करून उद्घाटन करताना ज्येष्ठ व्याख्याते प्रमोद गजनन गणपुले. व्यासपीठावर यतीन काकोडकर, अरविंद वाडीकर, ॲड. सुरेश काणकोणकर, उत्कर्षा बाणस्तारकर, दिपाली बाणस्तारकर, जितेंद्र शिरगावकर, मृणाल लोलयेकर व रितेश नार्वेकर.**

भाऊसाहेब मुख्यमंत्री झाल्यानंतरची कारकिर्द सर्वांना माहिती आहे. प्रत्येकजण भाऊसाहेबांशी मनाने जोडलेले आहेत. त्यांची कारकिर्द ही एखाद्या मंदिराच्या कळसासारखी आहे. नितीमत्ता आणि परिश्रम या दोन गोष्टीतून आपले आयुष्य भाऊसाहेबांनी जगले आजच्या पिढीने भाऊसाहेबांना समजून घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ व्याख्याते प्रमोद गणपुले यांनी गोमंतक मराठा समाजातर्फे स्व. भाऊसाहेब बांदोडकर यांच्या ५०व्या पुण्यतिथीनिमित्त संस्थेच्या राजाराम स्मृती सभागृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे या नात्याने केले.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अरविंद वाडीकर, सन्मानीय अतिथी म्हणून यतीन काकोडकर, गोमंतक मराठा समाजाचे अध्यक्ष सुरेश काणकोणकर, उपाध्यक्ष दीपाली बाणस्तारकर, सचिव उत्कर्षा बाणस्तारकर खजिनदार जितेंद्र शिरगांवकर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्याहस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

भाऊसाहेब हे स्वाभिमानी होते. त्यांचे बालपण अतिशय प्रतिकूल




**ज्येष्ठ पत्रकार प्रमोद खांडेपारकर यांना स्व. भाऊसाहेब बांदोडकर स्मृती तृतीय समाजभूषण पुरस्कार प्रदान करताना प्रमोद गणपुले, अरविंद वाडीकर, यतीन काकोडकर व इतर.**

वातावरणात गेले. मामांच्या घरी जन्म झाला. आई वडील बालपणात वारले, त्यानंतर काका काकूनी सांभाळ केला. परंतु काही वर्षानी म्हणजेच वयाच्या १७ व्या वर्षी काका काकूंचे निधन झाले. डोक्यावर मायेचे छत्र नसतानादेखील नीतीमत्ता व परिश्रम हे सोडले नाही. भाऊसाहेबांचे बालपण आजच्या मुलांनी वाचणे, त्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. मुख्यमंत्रीपदाच्या दहा वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी गोव्याच्या विकासाचा, उद्‌धाराचा पाया रचला त्यामुळे त्यांचे स्मरण करणे महत्त्वाचे आहे. भाऊसाहेबांचे बालपण प्रतिकूल वातावरणात गेले. घरात मार्गदर्शन करणारे कुणी नसतानादेखील त्यांनी सचोटी, सद्‌गुण सोडले नाहीत. आपल्या देशात अनेक दानशूर होऊन गेले. त्यातीलच एक भाऊसाहेब होते भाऊसाहेबांनी निःस्वार्थपणे कार्य केले. भाऊ हे अत्यंत स्वाभिमानी होते. समाजकार्याची त्यांना तळमळ होती. १९४७ साली जेव्हा भारत स्वतंत्र झाला तेव्हा गोवामुक्तीसाठी गती मिळाली. १९४२च्या भारत छोडो आंदोलनातसुद्धा त्यांनी सहभाग घेतला होता. यातूनच त्यांना नेतृत्व करण्याची व लोकांना एकत्रित करून मार्गदर्शन करण्याची प्रेरणा मिळाली. त्यानंतर गोवा स्वतंत्र झाल्यांतर महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाची स्थापना केली. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत ते उभे राहिले नाहीत कधी निवडणूक लढविली नाही, आमादरकी सांभाळली नाही. तरीसुद्धा गोव्यातील लोक त्यांना मुख्यमंत्री करतात यातून त्यांच्याबाबत असलेला विश्वास दिसून येतो. भाऊसाहेबांचा हा विश्वास शेवटपर्यंत राहिला, असे प्रमोद गणपुले यांनी सांगितले.

यावेळी प्रमोद गणपुले यांच्याहस्ते शाल, श्रीफळ, मानचिन्ह व रोख रक्कम



**भाऊसाहेब बांदोडकर यांच्या ५० व्या पुण्यतिथीनिमित्त श्री. आकाश नाईक यांनी साकारलेली भाऊसाहेबांची रांगोळी.**

देऊन ज्येष्ठ पत्रकार तथा समाजसेवक प्रमोद खांडेपारकर यांचा समाजभूषण पुरस्काराने सन्मान करण्यात आला. मानपत्राचे लिखाण श्री. नितीन कोरगांवकर यांनी केले असून वाचन दिपाली बाणस्तरकर यांनी केले.

भाऊसाहेब आणि माझी ओळख होती. गोव्याचा भाग्यविधाता म्हणून त्यांना मान्यता होती. समाज प्रबोधनाची क्रांती त्यांनी सुरू केली आणि त्याला लगेच फळ आले. सर्व समाजाच्या घटकांना त्यांनी आधार दिला समाज सुधारणा म्हणून आज समाजातील पिढी पुढे जात आहे समाजातील महिलांसुद्दा पुढे येऊन कार्य करत आहेत, असे मत प्रमोद खांडेपारकर यांनी सत्कारपर भाषणात बोलताना व्यक्त केले.

भाऊसाहेब बांदोडकर हे गोव्याचे भाग्यविधाते आहेत. त्यांच्यामुळेच गोमंतकीयांचे भाग्य उजळले सामान्य माणसाचे ते आधार होते याशिवाय उत्तुंग राजकारणीसुद्धा ते होते. त्यांचे उदाहरण आजच्या पिढीने घेण्यासारखे आहे. भाऊसाहेबांचे जीवनचरित्र तुमच्यासमोर ठेवले तर त्यातील एक तरी गुण आजच्या पिढीने आत्मसात करणे गरजेचे आहे. समाजातील समस्या सोडविण्याकरीता प्रत्येकाने सहकार्य करणे आवश्यक आहे. समाजाच्या आर्थिक बळकटीकरिता




**भाऊसाहेब बांदोडकर यांच्या ५० व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात आपले विचार मांडताना यतीन काकोडकर**

सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. असे मत अरविंद वाडीकर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष या नात्याने बोलताना व्यक्त केले.

गोमंतक मराठा समाज उत्तमरित्या कार्य करीत आहे. तरुण पिढी भाऊसाहेबांचा वारसा नक्कीच पुढे नेईल. भाऊसाहेब बांदोडकर यांचे कार्य तरूण पिढीला प्रेरणा देणारे आहे, असे यतीन काकोडकर यांनी सांगितले.

यावेळी भाऊसाहेब बांदोडकर यांच्या ५० व्या पुण्यतिथिनिमित्त गोमंतक मराठा समाजाच्या केंद्रीय कार्यकारिणी, तालुका समिती व कर्मचारी वर्गाला स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. तसेच गोवा विद्यालय मर्यादित आठवी व दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांकरिता आमंत्रित निबंध स्पर्धेतील विजेत्यांना चषक देऊन प्रमुख पाहुण्यांच्याहस्ते गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मृण्मयी मांद्रेकर यांनी केले तर आभार जितेंद्र शिरगावकर यांनी मानले.



**उपस्थित समाज बांधव.**

# भाऊसाहेब बांदोडकर यांची ५० व्या पुण्यतिथिनिमित्त तालुकास्तरीय श्रद्धांजली कार्यक्रम




**पेडणे तालुका**

भाऊसाहेब बांदोडकरांच्या पुण्यतिथीनिमित्त पेडणे तालुका गोमंतक मराठा समाजातर्फे मालपे येथे आदरांजली वाहण्यात आली. तसेच कासारवर्णे येथील सरकारी इस्पितळात जाऊन रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. डॉ. अमित सावंत व डॉ. तनया चोडणकर यांनी स्वागत केले. यावेळी समाजाचे अध्यक्ष प्रशांत धारगळकर, आशिष मांद्रेकर, नवजीत तोरसकर, संकेत मांद्रेकर, विनोद मालपेकर, नरेश कोरगावकर, प्रेमनाथ धारगळकर, संतोष मालपेकर, शंभुराव हरमलकर, मिलन कामुलकर, कोरगावच्या पंच अनुराधा कोरगावकर, स्वाती मालपेकर आणि पूजा कोरगावकर हे उपस्थित होते.

**ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थ्यांचा गौरव**

भाऊसाहेब बांदोडकर यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून दि. २० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता पेडणे भगवती हायस्कूल सभागृहात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावेळी मराठा समाजाला योगदान देणाऱ्या ज्येष्ठांचा सत्कार करण्यात आला. मोहन (काका) पेडणेकर, नवनाथ तोरस्कर आणि हणखणेचे राघोबा नाईक यांचा यामध्ये समावेश होता. तिघांचा मानचिन्हे, शाल, श्रीफळ, फुले देऊन सत्कार करण्यात आला.

तसेच दहावी, बारावी आणि पदवी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा



**भाऊसाहेब बांदोडकर यांच्या ५० व्या पुण्यतिथीचे औचित्य साधून पेडणे तालुका समितीतर्फे समाजातील जेष्ठ नागरिकांचा सत्कर करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुण्या ज्योतीताई बांदेकर यांच्यासमवेत सत्कारमूर्ती व समितीचे इतर पदाधिकारी.**

गौरव करण्यात आला. सरकारी प्राथमिक शाळेला समाजातर्फे खेळाचे साहित्य वितरित करण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भाऊसाहेबांच्या कन्या ज्योतीताई बांदेकर, नगराध्यक्ष सिद्देश पेडणेकर, गोमंतक मराठा समाज केंद्रीय समिती अध्यक्ष ॲड. सुरेश काणकोणकर, पेडणे गोमंतक मराठा समाजाचे अध्यक्ष प्रशांत धारगळकर आदी उपस्थिती होते.

## बार्देश तालुका



**बार्देश तालुका समितीतर्फे स्व. भाऊसाहेब बांदोडकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.**



मुरगांव तालुका समितीतर्फे स्व. भाऊसाहेब बांदोडकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.



फोंडा तालुका समितीच्या वतीने फर्मागुडी येथे भाऊसाहेब बांदोडकर पुण्यतिथी कार्यक्रम साजरा करण्यात आला. त्यावेळी समिती कार्यकारिणी समवेत समाज बंधू भगिनी.



**केपे तालुका समितीतर्फे भाऊसाहेब बांदोडकर पुण्यतिथी निमित्त श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.**




**धारबांदोडा तालुका समितीतर्फे भाऊसाहेब बांदोडकर पुण्यतिथी निमित्त श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.**




## सांगे तालुका

सांगे तालुका समितीच्या वतीने १२ ऑगस्ट रोजी सावर्डे आनंदवाडी येथील श्री शारदा हायस्कूलच्या सभागृहांत पुण्यतिथी साजरी करण्यात आली. व्यासपिठावर मुख्य पाहुणे म्हणून श्री. विनय तेंडुलकर, मुख्य अतिथी सौ. चिन्मई चंदन नाईक, अतिथी श्री. निलेश तारी, अध्यक्ष श्री. रणजीत स. नाईक, उपाध्यक्ष राजेश उ. वेर्लेकर, सचिव श्री. संजीव शं. नाईक, सह सचिव श्री. हरिश्चंद्र वि. सांगेकर व खजिनदार श्री. दयानंद के. नाईक उपस्थित होते.

शारदा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. श्री. विवेक नाईक यांनी मान्यवरांची ओळख करून दिली. पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरूवात केली.

हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी रांगोळी व वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यांत आली. सौ. रिद्धी अनिकेत सावर्डेकर यांनी सूत्र संचालन केले. शेवटी सौ. दीक्षा दयानंद नाईक यांनी सर्वांचे आभार मानले.

# तालुकास्तरीय नूतन समिती (२०२३–२०२६)



काणकोण तालुका : अध्यक्ष – सतिश पैंगिणकर, उपाध्यक्ष – प्रदिप खोलकर, सचिव – वसंत देविदास, संयुक्त सचिव – मोहन काणकोणकर, खजिनदार – हरिशचंद्र खोलकर, सदस्य – संतोश नाईक, गुरुदास खोलकर, प्रविण नाईक, राजू काणकोणकर, गोकुळदास काणकोणकर, मिना लोलयेंकर, हेमा नाईक, सल्लागार – रमाकांत बांदेकर, प्रदिप गायक.



मुरगांव तालुका : अध्यक्ष – दिपक काणकोणकर, उपाध्यक्ष – नरेंद्र नाईक, सचिव – सुनील नाईक, संयुक्त सचिव – गीता नाईक, खजिनदार – प्रल्हाद मोरजकर, सदस्य – मिलिंद काकोडकर, कृष्णा तोरस्कर, चंदा बांदेकर, बिपीन काकोडकर, विश्वास नाईक, शुभांगी नार्वेकर, सुनील केरकर, प्रमोद देविदास, बिंदीया काकोडकर.




केपे तालुका : अध्यक्ष – ज्ञानेश्वर मळकर्णेकर, उपाध्यक्ष – गणेश देविदास,
सचिव – मंगेश देविदास, संयुक्त सचिव – करुणा बाळ्ळीकर,
खजिनदार – रमेश देविदास, सदस्य – मनस्विनी पैंगिणकर, शितल नाईक,
सुधाकर बाळ्ळीकर, ज्योती पर्वतकर, धनंजय देविदास, संदिप काकोडकर,
दिनेश काकोडकर, मोहित मोहन नाईक,
सल्लागार – लक्ष्मीकांत बाळ्ळीकर, विलास बाळ्ळीकर.



केपे तालुका महिला समिती : अध्यक्ष – सौ. शितल एस. नाईक, उपाध्यक्ष – देविता डी. मलकर्णेकर, सेक्रेटरी – सौ. सुचिता फातर्पेकर, संयुक्त सचिव – सौ. मनस्विनी पैंगिणकर, खजिनदार – सौ. कामिनी ज्योतिकर, सदस्य – सौ. शिवानी देविदास, सौ. दुर्गा काकोडकर, सौ. श्रृती फातर्पेकर, सौ. सुरेखा शेर्ल्डेकर, सौ. संजवी संजय देविदास, सौ. पुजा प्रमोद आमोणकर, सौ. सुश्मीता एस. काकोडकर.




धारबांदोडा तालुका : अध्यक्ष – मंगेश देवळी , उपाध्यक्ष – राजेश सांगोडकर,
सचिव – अक्षया मायरेकर, संयुक्त सचिव – शैलजा कुडचडकर,
खजिनदार – प्रशांत देविदास, सदस्य – सिद्धेश साकोर्डेकर, मंगलदास मायरेकर,
पुनाजी आगलोतकर, सत्यवान नाईक, मयूर देविदास, सत्यवान देविदास,
दिपक उसगांवकर, वैष्णवी कुडचडकर, शुभम देविदास,
सल्लागार – दिव्या देविदास, प्रकाश अग्लोतकर.




सांगे तालुका : अध्यक्ष – रणजित नाईक, उपाध्यक्ष – राजेश वेर्लेकर,
सचिव – संजीव नाईक, संयुक्त सचिव – हरिश्चंद्र सांगेकर,
खजिनदार – दयानंद नाईक, सदस्य – सुधाकर पेरणी, दिपक नाईक,
ममता उडपीकर, प्रविण कुर्डीकर, अर्जून देवळी, सुरेश वेर्लेकर,
विनोद देविदास, सुशांती अडणेकर,
सल्लागार – विनोद जांबावलीकर, गणपत देविदास, विवेक नाईक.




फोंडा तालुका : अध्यक्ष – सुरेंद्र वळवईकर, उपाध्यक्ष – हेमंत वेलिंगकर,
सचिव – सचिन वंदगेकर, संयुक्त सचिव – सतिश हळदणकर,
खजिनदार – सिद्धेश हळदणकर, सदस्य – सुवर्णा कोठंबिकर, शिवनाथ नाईक,
किशोर नाईक, रामराव नागेशकर, सिद्धार्थ गिरोडकर, अनुराधा म्होर्दोळकर,
युवा सदस्य – लिखिल कवळेकर, सल्लागार – अरविंद वाडीकर, दिलेश कोलवेकर.



डिचोली तालुका : अध्यक्ष – केशव नाईक, उपाध्यक्ष – ज्योती सतिश नाईक,
सचिव – मधु नाईक, संयुक्त सचिव – प्रदिप नावेलकर,
खजिनदार – गणेश शिरगांवकर, सदस्य – सौ. आर्चना आनंद नाईक,
विवेक शिरगांवकर, विनोद शिरगांवकर, अनिल नाईक, शेखर नाईक,
मृणाल महेश नाईक, जयेश नाईक, विशया सुनिल नाईक,
सल्लागार – सागर विर्डीकर, आनंद नाईक



बार्देश तालुका : अध्यक्ष – डॉ. योगेश नाईक, उपाध्यक्ष – गिरीश नाईक माशेलकर,
सचिव – सिद्धेश पेडणेकर, संयुक्त सचिव – सौ. लक्ष्मी नार्वेकर,
खजिनदार – प्रभाकर मांद्रेकर, सदस्य – सौ. इंदिरा नाईक, सौ. राखी नाईक,
सौ. सोनल नाईक, सौ. पुजा नाईक, रिषभ नाईक माशेलकर,
सल्लागार – रघुनाथ मांद्रेकर, दुर्गेश वेरेकर.



पेडणे तालुका : अध्यक्ष – प्रशांत जी. धारगळकर, उपाध्यक्ष – अशिश मांद्रेकर,
सचिव – मधु नाईक, संयुक्त सचिव – स्वाती स. मालपेकर,
खजिनदार – नवजीत न. तोरस्कर, सदस्य – संकेत मांद्रेकर, गणपत नाईक, मिलन कामुलकर, पूजा कोरगांवकर, अनुराधा कोरगांवकर, मेधा नाईक, विनोद मालपेकर,
दिपाक नाईक, माजी सदस्य – प्रमोद केरकर, स्विकृत सदस्य – राजेश मांद्रेकर,
सल्लागार सदस्य – प्रशांत मांद्रेकर, सुविधा सुदीप कोरगांवकर.



तिसवाडी तालुका : अध्यक्ष – सुनिता पेडणेकर, उपाध्यक्ष – श्रद्धा नाईक, सचिव – महेश्वरी वळवईकर, संयुक्त सचिव – वैष्णवी विर्डीकर, खजिनदार – नारायणदास आमोणकर, सदस्य – राधा नाईक, उदय विर्डीकर, हर्षराज बाणस्तारकर, रुतूजा आमोणकर, सागरिका आमोणकर, सिमरन काकोडकर, नताशा आमोणकर, प्रशांत माशेलकर, सल्लागार – रोहिदास नाईक.

## तिसवाडी तालुका महिला समिती :

अध्यक्ष – सौ. सलोनी चेतन आमोणकर,
उपाध्यक्ष – सौ. श्रृती दयानंद नाईक,
सचिव – सौ. पद्मा संजिव नाईक,
सदस्य – सौ. दिपा धिरज नाईक, श्रीमती, अनुप्रभा रायकर, सौ. दिपा रायकर, सौ. ऋतूजा आमोणकर, सौ. अर्चना नाईक, सौ. सरिता नाईक, कु. चेताली नाईक, सौ. सोनल सचिन विर्डिकर, श्रीमती नयन नाईक.

## सत्तरी तालुका समिती :

अध्यक्ष – अर्जून रामचंद्र नाईक,
उपाध्यक्ष – जुबेन अनंत नाईक,
सचिव – निलीमा मोहन नाईक,
खजिनदार – प्राची महादेव नाईक,
सदस्य – जयराम एस. नाईक, संदिप नाईक, संतोष नाईक, लक्ष्मण नाईक, परेश नाईक, साईश नाईक.

## तालुकास्तरीय शिष्यवृत्ती प्रदान कार्यक्रम




बार्देश तालुका



डिचोली तालुका




मुरगांव तालुका



केपे तालुका




तिसवाडी तालुका




धारबांदोडा तालुका



## फोंडा तालुका

# शिक्षणा बरोबर क्रीडा क्षेत्रातही प्रावीण्य मिळवा

विद्यार्थ्यांनी शिक्षणा बरोबर क्रीडा क्षेत्रातही प्रावीण्य मिळविले पाहिजे. खेळामुळे उच्च शिक्षण घेत असताना त्याचा उपयोग होतो. असे उद्गार निवृत्त डी व्हाय एस पी श्री. मनोज वि. मार्दोळकर यांनी थ्रीफ्ट सभागृहात गोमंतक मराठा समाज्याच्या वतीने फोंडा तालुक्यातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरण समारंभात काढलें. यावेळी व्यासपीठावर फोंडा तालुका समितीचे अध्यक्ष श्री. सुरेंद्र वळवईकर, उपाध्यक्ष हेमंत वेलिंगकर, खजिनदार सिद्धेश हळदणकर केंद्रीय समितीच्या उपाध्यक्ष सौ. दिपाली बाणास्तारकर, सचिव उत्कर्षा बाणास्तारकर, आणि सदस्य श्री. रितेश नार्वेकर उपस्थित होते. यावेळी इयत्ता पाचवी ते उच्च शिक्षण २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षात घेत असलेल्या एकुण १०४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

सौ. सुवर्णा कोठंबीकर, सौ. अनुराधा म्हार्दोळकर आणि श्री. सिध्दार्थ नाईक यानी मान्यवरांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. अध्यक्ष श्री सुरेंद्र वळवईकर यांनी सर्वांचे स्वागत आणि व्यासपीठावरील मान्यवरांचा परिचय करून दिला. शिषवृती मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या नावांचे वाचन कु. शुभान हळदणकर यांनी केले.

सर्वांचे आभार उपाध्यक्ष हेमंत वेलिंगकर यांनी मानले, संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव श्री. सचिन वंदगेकर यांनी केले.

## काणकोण तालुका



गोमंतक मराठा समाजाने कोणत्याही सुविधा नसताना शिक्षण आणि सांस्कृतिक क्षेत्रात अस्तित्व निर्माण केले. समाजातील युवकांनी कौशल्य प्रधान शिक्षण घेऊन स्वतःसह समाजाचा नावलौकिक वाढवावा, असे आवाहन पत्रकार तरुण भारत दक्षिण गोवा डेस्क इन्चार्ज सूरज प्रभू यांनी केले.

गोमंतक मराठा समाज काणकोणक शाखेने नगर्से येथील श्री दत्तगुरु मंदिरात आयोजित केलेल्या शिष्यवृत्ती वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी समाजाचे केंद्रीय अध्यक्ष ॲड. सुरेश काणकोणकर, सचिव मृणाल लोलयेकर, विशेष अतिथी म्हणून अजित पैंगीणकर, काणकोण शाखेचे अध्यक्ष सतीश पैंगीणकर उपस्थित होते. ज्येष्ठ पत्रकार अजित पैंगिणकर यांनी आरक्षणाच्या कोणत्याही सुविधा नसताना समाज बांधवांनी शिक्षण, उद्योग, सांस्कृतिक क्षेत्र आणि राजकारणात जे नाव कमावले आहे, हाच आदर्श घेऊन आजच्या पिढीने पुढे जावे.

यावेळी तालुक्यातील पाचवी ते दहावी, बारावी, पदवी आणि उच्च शिक्षण घेणाऱ्या १३४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. यावेळी १ लाख २० हजार रुपयांची रक्कम वितरित करण्यात आली. अध्यक्ष सतीश पैंगीणकर यांनी स्वागत केले. हरिश्चंद्र खोलकर यांनी सूत्रसंचालन केले.

# सांगे तालुका




दि. ३ सप्टेंबर २०२३ रोजी सांगे तालुक्यातील ५ वी ते उच्च शिक्षीत पर्यंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान सोहळा गुरूकूल सभागृहांत पार पडला.

या सोहळ्याला मुख्य पाहुणे म्हणून समाज कल्याण मंत्री माननीय श्री. सुभाष फळदेसाई हजर होते. तसेच केंद्रीय समितीचे खजीनदार श्री. जीतेंद्र शिरगांवकर, प्रहर सावर्डेकर व मनोज पैंगीणकर हजर होते. एकूण ६७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. वक्रतुंड महाकाय या गिताने कार्यक्रमाला सुरूवात झाली. सौभाग्यवती पल्लवी अजय देवळी हीने कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. माननीय मंत्र्यानी आपल्या भाषणात ज्या प्रमाणे लता मंगेशकर, आशा भोसले व उषा मंगेशकर या तीन भगिनींनी व हृदयनाथ मंगेशकर यांनी गोव्याचे नाव संपूर्ण जगाच्या नकाशावर प्रकाशित केले तसेच विद्यार्थ्यांनी चांगले परिश्रम घेऊन गोव्याचे व गोमंतक मराठा समाजाचे नाव लौकीक करावे असे नमूद केले.

श्री. दयानंद नाईक याने पाहुण्यांची ओळख करून देत असताना त्यांच्या कार्याची स्तूती केली. शेवटी गणपत देविदास यांने सर्वांचे आभार मानले.





**माजी मुख्यमंत्री स्व. भाऊसाहेब बांदोडकर यांची प्रतिमा विर्नोडा पंचायतीच्या सरपंच सुजाता ठाकूर यांच्याकडे प्रदान करताना गोमंतक मराठा समाजाचे अध्यक्ष प्रशांत धारगळकर. सोबत सुदीप कोरगावकर, स्वाती मालपेकर, अक्षता सावंत व इतर.**

गोव्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. भाऊसाहेब बांदोडकर यांची प्रतिमा पेडणे गोमंतक मराठा समाजातर्पे विर्नोडा पंचायतीला भेट देण्यात आली. एका विशेष कार्यक्रमात सरपंच सुजाता ठाकूर व पंचायत मंडळाने ती स्विकारली.

समाजाच्या कार्यकर्त्यांनी अशाच प्रकारे गावागावात जाऊन समाजाचे नाव मोठे करावे. तसेच उपक्रम राबवून समाजाचे व पेडणे तालुक्याचे नाव मोठे करावे, असे आवाहन सरपंच सुजाता ठाकूर यांनी केली.

यावेळी पंच स्वाती मालपेकर, अक्षता सावंत, दामोदर नाईक, सागर परब, महेंद्र परब, सचिव रुपेश कळंगुटकर, विष्णू कांबळी, सेजल कवठणकर, दीपक देऊलकर, पेडणे गोमंतक मराठा समाजाचे अध्यक्ष प्रशांत धारगळकर, समाजाचे ज्येष्ठ नेते सुदीप कोरगावकर, सचिव लक्ष्मण नाईक, सुविधा कोरगावकर, राजेश मांद्रेकर, संकेत मांद्रेकर, स्वाती मालपेकर, पूजा कोरगावकर, विनोद मालपेकर यावेळी उपस्थित होते. विर्नोडा येथील संत सोहिरोबानाथ आंबिये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. फिलिप्स रॉड्रिग्ज डिमेलो यांनाही भाऊसाहेब बांदोडकर यांची प्रतिमा भेट म्हणून देण्यात आली.

# स्वातंत्र्यसैनिक दाम्पत्य
# **कै. दामोदर कवळेकर** आणि
# कै. सौ. कुमुदिनी (पैंगिणकर) कवळेकर



दामोदर कवळेकर यांचा जन्म कवळें येथे झाला. बालपणी त्यांचे वास्तव्य मडगांव शहरांत झाले.

शिक्षण पूर्ण केल्यानंतर वास्को येथे एमपीटी मध्ये खाजगी नोकरी केल्यावर त्यांनी भाटीकर हायस्कुल, मडगांव व होली ट्रिनिटी हायस्कुल, बाणावली येथे शिक्षक म्हणून हायस्कुलमध्ये विद्यादान केले.

गोवा मुक्तिनंतर त्यांनी भाटीकर हायस्कुलमध्ये कायम स्वरूपी नोकरी धरली व १९९२ साली ते हेडमास्तर म्हणून निवृत्त झाले.

गोमंतवाणी, दैनिक नवहिंद, दैनिक नवप्रभा, व दैनिक गोमन्तकमध्ये काही काळ पत्रकारिता केली.

दामोदर कवळेकर सरांनी स्वातंत्र्यसैनिक पुरुषोत्तम काकोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. तथापी त्यांना कधीच अटक झाली नसल्यामुळे त्यांचे नाव स्वातंत्र्यसैनिकांच्या यादीत आले नाही.

गोवा मुक्तिनंतर त्यांनी आपले नांव स्वातंत्र्यसैनिक यादीत नोंद करून घेतले नाही.

शामराव मडकईकर यांच्या मार्गदर्शनाखाली माध्यमिक शिक्षक संघटनेचे ते एक संस्थापक सदस्य होते. हायस्कुलमधून निवृत्तीनंतर ते पूर्णपणे 'मार्ग' या सामाजिक संस्थेशी जोडले गेले.

महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाचेही ते एक संस्थापक सदस्य होते. गत २ जून २०२३ रोजी वयाच्या ९१ व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली.

## कै. सौ. कुमुदिनी (पैंगिणकर) कवळेकर



स्वातंत्र्य सेनानी कुमुदिनी दामोदर कवळेकर या पूर्वाश्रमीच्या कुमुदिनी पैंगिणकर. त्यांचा जन्म पुणे येथे झाला. तरुणपणी त्या राष्ट्रीय सेवा दलाच्या संपर्कात आल्या.

विठ्ठल लोलयेंकर यांच्याशी संपर्क आल्यावर दोडामार्ग येथून येऊन म्हापसा येथे वास्तव्य केले. आरोग्याच्या तक्रारीमुळे त्या गोव्यात आल्या. ५ एप्रिल १९५५ रोजी म्हापसा येथे महिला सत्याग्रहात त्यांनी भाग गेतेला.

सत्याग्रहात त्यांना पकडण्यात आल्यावर त्यांची रवानगी रेईश मागूश, केपे, मडगांव, कैदखान्यात करण्यात आली. अशा प्रकारे, केवळ अठरा वर्षांच्या असताना त्यांना साडेपांच वर्षांचा कारावास ठोठावण्यात आला. तथापि साडे तीन वर्षांच्या कारावासानंतर त्यांची सुटका करण्यात आली.

सिंधूताई देशपांडे, अंबिका दांडेकर, शशिकला होडारकर, मित्रा काकोडकर बीर, सूर्यकांती फळदेसाई यांच्या बरोबरीने त्यांनी वेळोवेळी सत्याग्रहात भाग घेतला. गोवा मुक्तिपूर्वी त्यांचा विवाह स्वातंत्र्यसैनिक, शिक्षक, पत्रकार, समाजकार्यकर्ते दामोदर कवळेकर यांच्याशी झाला. त्यांचे वास्तव्य मडगाव येथे होते. गोवा मुक्तिपूर्वी काळात लोक स्वातंत्र्यसैनिक व सत्याग्रही यांच्यापासून चार हात दूरच रहायचे व त्यांच्याशी कोणताही संबंध ठेवताना घाबरायचे.

अशा वेळी होली ट्रिनीटी हायस्कुलचे प्रिन्सिपॉल फादर आंतोन यांनी त्यांच्या लग्नाचा स्वागत समारंभ हायस्कुलच्या सभागृहात अयोजित केला होता. गोवा मुक्ती व लग्नानंतर त्यांनी समाज कार्यात भाग घेतला. १९७५ साली त्या आके ग्रामंपचायतीच्या पंच सदस्य म्हणून निवडून आल्या.

१९८० साली मडगांव नगर पालिकेच्या नगरसेविका म्हणून वॉर्ड क्रमांक पांच मधून निवडून आल्या.

भारत देशाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त भारताच्या प्रधानमंत्र्यांच्या हस्ते त्यांना ताम्रपत्र प्रदान करून त्यांच्या सेवेची दखल घेण्यात आली.

# अभिनंदन




## श्रेयस अजय पेडणेकर

म्हार्दोळ-फोंडा

यांनी Onen 8 Ball Pool Championship 2023 जिंकल्याबद्दल त्याचे अभिनंदन व शुभेच्छा!



## श्री. प्रशांत धारगळकर

पेडणे तालुका समिती अध्यक्ष

यांना स्वातंत्र्यदिनी Fire Service Medal for Meritarious Service देऊन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सांवत यांच्या हस्ते गौरविण्यात आले. त्यांच्या या गौरवाकरिता संस्थेतर्फे अभिनंदन व शुभेच्छा!

---



## इना महेंद्र नाईक

नेरूल, बार्देश-गोवा

वैद्यकीय शाखेत प्रवेश मिळवल्याबद्दल अभिनंदन व शुभेच्छा!



## प्राप्ती जितेंद्र नाईक

नेरूल, बार्देश-गोवा

वैद्यकीय शाखेत प्रवेश मिळवल्याबद्दल अभिनंदन व शुभेच्छा!



## दिया गौतम सावर्डेकर

दत्तवाडी, सावर्डे

वैद्यकीय शाखेत प्रवेश मिळवल्याबद्दल अभिनंदन व शुभेच्छा!

# नूतन सभासदांचे हार्दिक स्वागत!!

| | | | |
|---|---|---|---|
| १) | स्वस्ती उमेश बाणस्तारकर | मळा, पणजी | तिसवाडी |
| २) | ॲड. यश योगेश नाईक | शिरसई | बार्देश |
| ३) | कालिदास मनोज नाईक | सावतावाडा, कळंगुट | बार्देश |
| ४) | विधान दीपक बाणस्तारकर | विकासनगर, करमळी | तिसवाडी |
| ५) | सुभाष गोविंद काणकोणकर | किंदळे | काणकोण |
| ६) | अविता अनिल जग्वी | नगर्से | काणकोण |
| ७) | रेशा राजेंद्र खोलकर | शिरोटी, खोला | काणकोण |
| ८) | अनिल महेश जग्वी | नगर्से | काणकोण |
| ९) | विनोद प्रे. पैंगीणकर | वेलवाडा, पैगींण | काणकोण |
| १०) | अनुप देविदास मालपेकर | हेडलँड सडा, वास्को | मुरगांव |
| ११) | राजू कुशाली बांदेकर | नवेवाडे, वास्को | मुरगांव |
| १२) | रितूजा राजेंद्र आमोणकर | बांयगिणी, ओल्डगोवा | तिसवाडी |
| १३) | सागारिका नितीन आमोणकर | व्हडलेभाट, ताळीगांव | तिसवाडी |
| १४) | दिपा देविदास आश्वेकर | आश्वेवाडा, मांद्रे | पेडणे |
| १५) | कौशल रमाकांत पेडणेकर | माऊसवाडा | पेडणे |
| १६) | गायत्री रमाकांत पेडणेकर | माऊसवाडा | पेडणे |
| १७) | देविदास महादेव आश्वेकर | आश्वेवाडा, मांद्रे | पेडणे |
| १८) | सिद्धेश शरद मांद्रेकर | देऊळवाडा, मांद्रे | पेडणे |
| १९) | भक्ती सिद्धेश मांद्रेकर | देऊळवाडा, मांद्रे | पेडणे |
| २०) | आशा शैलेंद्र पेडणेकर | देऊळवाडा, पार्से | पेडणे |
| २१) | शुभांगी सुरज नार्वेकर | मायमोळें, वास्को | मुरगांव |
| २२) | प्राजक्ता जगदीश पेडणेकर | सावरीभाट, वेळगे | डिचोली |
| २३) | अंबिका गणपत जोतकर | कुंभारवाडा, शिरवई | केपे |
| २४) | प्रदिप शंकर धारगळकर | बेलाबाय, वास्को | मुरगांव |

| | | | |
|---|---|---|---|
| २५) | महेंद्र पुंडलीक नाईक | नेरूल, फट्टवाडा | बार्देश |
| २६) | ईशा महेंद्र नाईक | फट्टवाडा, नेरूल | बार्देश |
| २७) | विवेक मनोहर कामुलकर | कुचेली, म्हापसा | बार्देश |
| २८) | अनिकेत अजित सावर्डेकर | आनंदवाडी, सावर्डे | सांगे |
| २९) | रिद्धी अनिकेत सावर्डेकर | आनंदवाडी, सावर्डे | सांगे |
| ३०) | प्रवीण कुर्डीकर | विचुंद्रे, नेत्रावळी | सांगे |
| ३१) | प्रियांका प्रवीण कुर्डीकर | विचुंद्रे, नेत्रावळी | सांगे |
| ३२) | रजत संदिप नाईक | देऊळवाडा, कुडणे | डिचोली |
| ३३) | अमोल अनिल नाईक | देऊळवाडा, कुडणे | डिचोली |
| ३४) | अनय अनिल नाईक | देऊळवाडा, कुडणे | डिचोली |
| ३५) | राजेंद्र पांडुरंग नाईक | चिरेंखाण, कुडणे | डिचोली |
| ३६) | प्रसाद प्रभाकर देविदास | हरवळें, साखळीं | डिचोली |
| ३७) | हरिशचंद्र सदा देविदास | देऊळवाडा, कुडणे | डिचोली |
| ३८) | चेतन हरिशचंद्र कुडणेकर | देऊळवाडा, कुडणे | डिचोली |
| ३९) | लक्ष हरिशचंद्र कुडणेकर | देऊळवाडा, कुडणे | डिचोली |
| ४०) | सविता विष्णू हरवळकर | गांवकरवाडा, कुडणे | डिचोली |
| ४१) | विजेंद्र वि. म्हार्दोळकर | म्हार्दोळ | फोंडा |
| ४२) | वैभवी विरेंद्र म्हार्दोळकर | म्हार्दोळ | फोंडा |
| ४३) | मंगलदास पांडुरंग मायरेकर | बाजारवाडा, कुळें | धारबांदोडा |
| ४४) | सचिन वंदगेकर | कुर्टी | फोंडा |
| ४५) | सुमित संतोष नार्वेकर | गणपतीवाडा, खांडोळा | फोंडा |
| ४६) | लेखांक गजानन माशेलकर | देऊळवाडा, मार्शेल | फोंडा |
| ४७) | दिक्षीता संदेश नार्वेकर | गणपतीवाडा, खांडोळा | फोंडा |
| ४८) | संदेश सुगंधी नार्वेकर | गणपतीवाडा, खांडोळा | फोंडा |
| ४९) | गजानन मोहन माशेलकर | देऊळवाडा, मार्शेल | फोंडा |
| ५०) | प्रेमानंद मोहन माशेलकर | देऊळवाडा, मार्शेल | फोंडा |

| | | |
|---|---|---|
| ५१) दिपाली प्रहर सावर्डेकर | बागवाडा, सावर्डे | सांगे |
| ५२) गौतम एकनाथ सावर्डेकर | दुधगळा, सावर्डे | सांगे |
| ५३) हर्ष गौतम सावर्डेकर | दुधगळा, सावर्डे | सांगे |
| ५४) स्वेता गौतम सावर्डेकर | दुधगळा, सावर्डे | सांगे |
| ५५) दिया गौतम सावर्डेकर | दुधगळा, सावर्डे | सांगे |
| ५६) रुपेश दयानंद पैगींणकर | वेलवाडा, पैंगीण | काणकोण |
| ५७) अशोक नारायण बांदेकर | देवाबाग, पाळोळे | काणकोण |
| ५८) शैलजा शैलेश कुडचडकर | बाजारवाडा, कुळें | धारबांदोडा |
| ५९) मिरा आनंद पेडणेकर | छोटे पेडें, म्हापसा | बार्देश |
| ६०) मंजिता मनोज पैंगीणकर | साईनगर, शिरवई | केपे |
| ६१) मंदेश्वर मनोज पैंगीणकर | साईनगर, शिरवई | केपे |
| ६२) दिक्षीता ज्ञानेश्वर मळकर्णेकर | सोमनाथ देवळांजवळ | केपे |
| ६३) ज्योती प्रसाद पर्वतकर | शास्त्रीनगर, शिरवई | केपे |
| ६४) संजय चंद्रकांत देविदास | खड्डे, बाळ्ळी | केपे |
| ६५) संजीवनी संजय देविदास | खड्डे, बाळ्ळी | केपे |
| ६६) राजीव शंकर मोरजकर | वडामोळ जवळ | केपे |
| ६७) मोहिनी मनोहर देविदास | देऊळवाडा, कुडणे | डिचोली |
| ६८) दिपा धीरज नाईक | पणजी | तिसवाडी |
| ६९) श्रृती दयानंद नाईक | मळा, पणजी | तिसवाडी |
| ७०) पल्लवी अजय देवळी | दाडों | सांगे |
| ७१) यश दत्ता देविदास | नववाडा, कुळे | धारबांदोडा |
| ७२) कावेरी राजू बांदेकर | नवेवाडा, वास्को | मुरगांव |
| ७३) गौरव चंद्रहास लोलयेंकर | हेडलँड सडा, वास्को | मुरगांव |

टीप : समाज बांधवांनी सभासद अर्ज भरताना, आपल्या पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता, संपर्क क्रमांक आवर्जून नमूद करावा. तसेच ज्या सभासदांचा पत्ता बदलला असल्यास कृपया कार्यालयात कळवावे.

# देणगी व तालुकास्तरीय शिष्यवृत्ती

प्रत्येक तालुक्यातून १०वी इयत्तेत
जास्तीत जास्त गुण मिळवून
इयत्ता ११वी विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेल्या
प्रथम विद्यार्थ्यांस

**श्री. उमेश अच्चुत नाईक**

निवृत्त मुख्याध्यापक,
पर्वरी–गोवा (मूळ रायबंदर)
पुरस्कृत केलेली बक्षिसे प्रदान करण्यात आली.

---

## संस्थेतर्फे देण्यात आलेली आर्थिक मदत

**ऑगस्ट – २०२३**

**मनोहर देविदास,** डिचोली
वैद्यकिय खर्चासाठी मदत १०,००० रुपये

---



**किरण जी. शिरगांवकर, शिरगांव – डिचोली यांना संस्थेतर्फे वैद्यकिय खर्चासाठी १०००० रुपये आर्थिक सहाय्य देण्यात आले. (जून २०२३)**



विलास वसंत पेडणेकर, काणकोण यांना संस्थेतर्फे घर दुरुस्तीसाठी
१०००० रुपये आर्थिक सहाय्य देण्यात आले. (जून २०२३)



अलका अशोक बांदेकर, काणकोण यांना संस्थेतर्फे वैद्यकिय खर्चासाठी
१०००० रुपये आर्थिक सहाय्य देण्यात आले. (जुलै २०२३)



**रमाकांत बांदेकर, काणकोण यांना संस्थेतर्फे वैद्यकीय खर्चासाठी १०००० रुपये आर्थिक सहाय्य देण्यात आले. (जुलै २०२३)**



**नितेश सूर्यकांत मुंगी, पेडणे यांना संस्थेतर्फे वैद्यकिय खर्चासाठी १०००० रुपये आर्थिक सहाय्य देण्यात आले. (जुलै २०२३)**



**गणपत नाईक, पेडणे यांना संस्थेतर्फे वैद्यकिय खर्चासाठी १०००० रुपये आर्थिक सहाय्य देण्यात आले. (ऑगस्ट २०२३)**

# श्रद्धांजली

दुखःद निधन झालेल्या समाज बांधवांच्या आत्म्यास शांती लाभो
अशी ईश्वर चरणी प्रार्थना.



**रत्नाकर देविदास**
कावरे, पिर्ला, केपे
यांचे
दि. ०५-०७-२०२३ रोजी
दुःखद निधन झाले.



**दत्ता फोंडेकर**
आर्के, मडगांव
यांचे
दि. २४-०९-२०२३
रोजी दुःखद निधन झाले.



**अनिल देविदास**
मोरपिर्ला, फातर्पा, केपे
यांचे दि. १२-०९-२०२३
रोजी दुःखद निधन झाले.



**वसंत विश्वनाथ माशेलकर**
भाटले-पणजी
यांचे दि. २७-०९-२०२३ रोजी दुःखद निधन झाले. ते माजी सचिव, तिसवाडी तालुका समिती श्री. प्रशांत माशेलकर व केंद्रिय समिती माजी सदस्य विशांत माशेलकर यांचे वडिल होत.



**सुरेंद्र विष्णूदास नाईक**
बांदा, असोळणा-सालसेत
यांचे वयाच्या ५८ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात आई - श्रीमती लक्ष्मीबाई, पत्नी - जयमिनी, कन्या - जीया, ज्येष्ठ भाऊ - डॉ. राजेश्वर व विवाहित बहिणी असा परिवार आहे.

**मायावती प्रभाकर देविदास**
सुळकर्णा-केपे



**आशाबाई जांबावलीकर**
जांबावली, सांगे
यांचे दि. ०३-१०-२०२३
रोजी दुःखद निधन झाले. त्या महिला समिती सांगेच्या माजी उपाध्यक्षा सौ. सुवर्णा रा. जांबावलीकर यांच्या सासू होत. तसेच केपे तालुका महिला सहसचिव सौ. मनस्विनी मनोज पैंगिणकर यांच्या आत्या होत.

# गोमंतक मराठा समाज, गोवा

# केंद्रिय कार्यकारी समिती २०२३-२०२६



**श्री. सुहास नाईक**
सदस्य
मो. : ९४२३७३६४२१



**श्री. अभय देविदास**
सदस्य
मो. : ९४२३३०९८५५



**श्रीमती सुफल मांद्रेकर**
सदस्य
मो. : ८६६८४३२३०७



**श्री. प्रहर सावर्डेकर**
स्वीकृत सदस्य
मो. : ९२७१६७४०९६



**श्री. अविनाश शिंदे**
स्वीकृत सदस्य
मो. : ९४२२०६०३६७



**श्री. रितेश नार्वेकर**
स्वीकृत सदस्य
मो. : ९८२२१०२९६०



**श्री. मनोज पैंगीणकर**
स्वीकृत सदस्य
मो. : ७६२०२४८१८८



**श्री. आनंद वाघुर्मेकर**
एक्स ऑफिशिओ
मो. : ९८२३०३५१५१

# गोमंतक मराठा समाज - गोवा

-: चिटणीस :-

**सौ. उत्कर्षा बाणस्तारकर**

मो. : ९९४५१६८८०२

-: संयुक्त चिटणीस :-

**सौ. मृणाल लोलयेंकर**

मो. : ९०४९९०५३३०

दयानंद स्मृती, स्वामी विवेकानंद मार्ग, पणजी-गोवा
४०३००१, दूरध्वनी - (०८३२) २२२६०९९

Email : gomantakmarathasamajgoa@gmail.com
Website : www.gomantakmarathasamajgoa.org

-: संपादक :-

**श्री. रंजन म. नाईक**

मो. : ९८२३१५४३३६ (Whats App also)

ईमेल : ranjan.naik12@gmail.com

-: व्यवस्थापक, मुद्रक व प्रकाशक :-

**ॲड. सुरेश काणकोणकर**

मो. : ९९६०३८९३७१/८६६८४२४५०७
यांनी गोमंत मराठा समाज, गोवा करिता
दयानंद स्मृती, पणजी-गोवा येथे प्रकाशित केले.

-: छपाई :-

**शरद एन्टरप्रायझेस**

ओल्डगोवा, मोबाईल - ९८८१४०९२३७